महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ३३ वा | गुरुवार, दि. २१ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५
८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# राज्यातील पालकमंत्री म्हणजे बिन दातांचे वाघ?

## फडणवीसांनी पालकमंत्र्यांची सगळी 'पॉवरच' काढून घेतली

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री पदातील सगळी पॉवरच काढून घेतल्याचे बोलले जाते. त्यामुळे यापुढे पालकमंत्री हे बिन दातांचे वाघ ठरणार का? असा सवाल विचारला जात आहे. नुकतेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीवाटपाच्या नवीन धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

या नवीन धोरणामुळे निधीवाटपात शिस्त आणली जाणार आहे. या नवीन धोरणामुळे सर्वपक्षीय आमदार सुखावणार असले तरी पालकमंत्र्यांच्या अधिकारांवर निर्बंध आल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत पालकमंत्र्यांबाबत अनेक तक्रारी होत्या. ज्या पक्षाचे पालकमंत्री आहेत, त्याच पक्षाच्या आमदार, खासदारांना आणि नेत्यांना जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपात झुकते माप दिले जाते. सत्तेतील इतर पक्षांचे आमदार, खासदार किंवा विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सुचवलेल्या कामांना निधी मिळत नाही. काही वेळा निधी मंजूर होऊनही खर्च होत नाही, अनावश्यक व बाजारभावापेक्षा जास्त दराने साहित्य, वस्तूंची खरेदी केली जाते, औषध खरेदी झाल्यावर ती 4 महिन्यांत एक्सपायर होतात अशा तक्रारी होत्या.



जिल्हा नियोजन समितीच्या निधीबाबत असलेले पूर्ण अधिकार हीच पालकमंत्री पदाची खरी पॉवर होती. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निवडणुकींचीही तयारी केली जायची. याच पॉवरसाठी पालकमंत्री आपल्याच पक्षाचा असावा यासाठी फिल्डिंग लावलेली असायची. या सगळ्या तक्रारींना वैतागून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही महिन्यांपूर्वी सर्व खात्यांचे सचिव व संबंधितांची बैठक घेतली होती. निधी वाटप धोरणात महत्त्वाचे बदल सुचविण्यासाठी समिती नियुक्त केली होती.

या समितीने तयार केलेल्या नवीन धोरणाला मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या धोरणानुसार आता जिल्हा नियोजन समितीने वर्षभरात किमान 4 बैठका घेणे बंधनकारक आहे. पालकमंत्र्यांनी या निधीतून करायाची कामे शक्यतो एप्रिलमध्येच जाहीर करावीत व त्यासाठीच्या निधीची माहिती द्यावी. कोणत्याही कामासाठी मंजूर केलेला निधी वाया जाणार नाही, याची काळजी घ्यावी व त्यादृष्टीने कामाची प्रगती पाहून निधी द्यावा.

एकूण निधीपैकी 70 टक्के निधी हा (पान 2 वर..)

# सोलापूर महापालिकेची मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी मोठी सवलत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे.

दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत 'विशेष मालमत्ता कर अभय योजना' राबविण्यात येणार असून या योजनेअंतर्गत थकबाकीदारांना त्यांच्या मालमत्ता करावरील व्याज व दंडात १०० टक्के सूट देण्यात येणार आहे.म्हणजेच नागरिकांनी केवळ मूळ कराची रक्कम भरल्यास व्याज व दंड पूर्णपणे माफ करण्यात येईल.

या योजनेमुळे थकबाकीदारांना मोठा दिलासा मिळणार असून, कर वसुलीतून महापालिकेच्या विकासकामांना गती मिळेल,



असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी सांगितले की, 'नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेत तातडीने थकबाकी भरावी. वेळेवर कर भरणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. कर वसुलीतूनच शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि विकासकामे उभारली जातात. त्यामुळे या योजनेला मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळेल असा विश्वास आहे.' या योजनेअंतर्गत कर भरण्यासाठी सर्व कर संकलन केंद्रांबरोबरच PhonePe, Paytm तसेच ऑनलाइन प्रणालीचा उपयोग करता येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

**योजनेचा कालावधी :** १ सप्टेंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५

**सवलत :** व्याज व दंड १००% माफ

केवळ मूळ मालमत्ता कर जमा करावा लागेल.

महापालिकेच्या या निर्णयामुळे अनेक थकबाकीदारांना दिलासा मिळणार असून, विकासाच्या गतीला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

# भीमा नदीत 1 लाख 46 हजाराचा विसर्ग

## नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी व वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील सततच्या पावसामुळे धरणाच्या पाणी पातळीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी उजनी धरणातून 91 हजार 600 क्यूसेक्स तर वीर धरणातून 54 हजार 760 क्यूसेक्स असा एकूण 1 लाख 46 हजार 360 क्यूसेक्स इतका विसर्ग सोडण्यात आल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

दि.20 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 3.00 वाजता संगम येथून 1 लाख 20 हजार 695 क्सूसेक्सने पाणी वाहत आहे तर चंद्रभागा नदी पात्रातून 60 हजार 247 क्सूसेक्सने पाणी वाहत आहे.उजनी व वीर धरण घाटमाथ्यावरील पावसाच्या प्रमाणानुसार व धरणामध्ये येणाऱ्या पाण्याच्या आवक (Inflow) नुसार विसर्गामध्ये अजून वाढ होण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने, नदीपात्रालगत पूरस्थिती निर्माण होवून सखल भागातील नागरी वस्तीमध्ये मध्ये पूराचे पाणी शिरण्याची शक्यता आहे. तसेच पाणी पातळी वाढत



असल्याने पंढरपूर तालुक्यातील 8 कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याखाली जाण्याची शक्यता असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने नीरा व भीमा नदी काठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी.

भीमा व नीरा नदीमधून मोठ्या पाण्याचा विसर्ग सुरु झालेला आहे त्यामुळे नदीतील कोल्हापूर पद्धतीचे सर्वच बंधारे पाण्याखाली जाणार आहेत. बंधारे पाण्याखाली गेलेल्यावर बॅरेकेट लावून वाहतुकीसाठी बंद करावेत.अशा सूचना तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील यांना दिलेल्या आहेत.

**नगरपालिका प्रशासन सज्ज**

उजनी व वीर धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी भीमा नदीला उजनीतून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु झालेला आहे त्यामुळे शहरातील चंद्रभागा नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सुरक्षेबाबत दक्षता घ्यावी तसेच पूर परिस्थितीत आवश्यक उपाययोजना करण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

तसेच नगरपालिका प्रशासनामार्फत उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथील रायगड भवन येथे एक हजार नागरिकांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच बाधित होणाऱ्या नागरिकांच्या जीवनावश्यक वस्तू नेण्यासाठी नगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत वाहनांची व्यवस्था करण्यात आली असून. स्थलांतरित करण्यात येणाऱ्या नागरिकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व स्वयंसेवी संस्थेमार्फत भोजन व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले.

# 'एमडी' ड्रग्जच्या तपासासाठी सोलापूरचे पोलिस मुंबईला रवाना

## सोलापूर, कलबुर्गीत आठजण जेरबंद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबईतून एमडी ड्रग्ज सोलापुरात आणून कलबुर्गी व सोलापूर शहराजवळील गावांमध्ये पुरवठा करणाऱ्या आठ जणांना सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. ते संशयित आरोपी मुंबईतून नेमके कोणाकडून व कोणत्या भागातून ते ड्रग्ज घेत होते, याच्या शोधासाठी ग्रामीण पोलिसांचे पथक मुंबईला रवाना झाले आहे. त्यातून ड्रग्ज पुरवठ्याचे मोठे रॅकेट समोर येईल, असे अधिकारी सांगत आहेत.

मुंबईतून पुणेमार्गे सोलापूरकडे येताना पाकणी फाट्याजवळ ग्रामीण पोलिसांनी पाच जणांना जेरबंद केले होते. त्यांच्याकडील तपासानंतर आणखी चौघांना अटक झाली होती. त्यात सोलापूर शहरातील मोहसीन इस्माईल शेख, इरफान इस्माईल शेख, मुजफ्फर अब्दुल जब्बार शेख, मुबारक राजअहमद शेख व अस्लम अहमद युसुफ बागवान या पाच जणांचा समावेश होता. तर त्यांच्यासोबत कलबुर्गीतील याकुब अली बागवान, मोहम्मद मतीन हाजी शेख आणि बाबा फरीद अब्दुल सलिम बागवान यांचाही समावेश आहे.

कलबुर्गीतील तिघांची ड्रग्ज पुरवठा करणाऱ्यांसमवेत थेट ओळख नसल्याने मोहसीन याने त्यांनाही सोबत नेले असावे, असा पोलिसांचा अंदाज आहे. ते तिघेजण कधीपासून या अवैध व्यवसायात होते, त्यांनी कोठे कोठे ड्रग्ज पुरवठा केला आहे, याचाही तपास ग्रामीण पोलिस करीत आहेत. याशिवाय या अवैध व्यवसायात त्या सर्वांना मदत करणारे चौघेजण पोलिसांच्या कारवाईनंतर मोबाईल बंद करून पसार झाले आहेत. त्यांचाही शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**सोलापूरसह दक्षिण, उत्तर तालुक्यात पुरवठा**

एमडी ड्रग्जची किंमत प्रतिग्रॅम चार हजार रुपए असून ते ड्रग्ज पाण्यात, गुटखा, माव्यात व खायच्या पानात टाकून घेतले जाते. सोलापूर शहराबरोबरच दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील (सोलापूर शहराजवळील गावे) सुमारे ४० ते ५० जण नियमित ते ड्रग्ज घ्यायचे. त्यांना हे सप्लायर ड्रग्ज आणून द्यायचे, अशाही बाबी तपासात समोर आल्या आहेत. या अवैध व्यवसायात आणखी कोणाकोणाचा सहभाग आहे, याचा शोध संशयितांच्या मोबाईलवरून घेतला जात आहे. त्यासाठी सर्वांचे मोबाईल फॉरेन्सिक लॅबला पाठविण्यात आले आहेत.

# राज्यात २० लाख एकर क्षेत्रावर पिकांचे नुकसान

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे खरिपाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून प्राथमिक अंदाजानुसार राज्यातील २० लाख १२ हजार ७७५ एकर क्षेत्राच्यावर पिकांचे नुकसान झाले आहे. राज्यातील ११ जिल्ह्यात दहा हजार हेक्टरपेक्षा जास्त बाधित झाले आहेत. यात सर्वाधिक नुकसान नांदेड आणि वाशिम जिल्ह्यात झाले असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

साधारण आठवडाभरापासून राज्यातील वेगवेगळ्या भागात जोरदार पाऊस सुरु आहे. अनेक भागात तर अतिवृष्टी



झाली असल्याने खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून या नुकसानीचे पंचनामे सुरू असून अहवाल मिळाल्यानंतर तात्काळ शेतकऱ्यांना मदत दिली जाईल. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

**१९ जिल्ह्यात झाला मुसळधार पाऊस**

राज्यातील तब्बल १९ जिल्ह्यांमधील १८७ तालुके आणि ६५४ महसूल मंडळांमध्ये मुसळधार पाऊस झाला असून मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार ८ लाख ५ हजार ११० हेक्टर म्हणजे तब्बल २० लाख १२ हजार ७७५ एकर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये १० हजार हेक्टरपेक्षा जास्त नुकसानग्रस्त क्षेत्र असलेले ११ जिल्हे समोर आले आहेत.

# 'भोगावती, नीलकंठाच्या नदीच्या पाणी पातळीत वाढ'

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील हिंगणी मध्यम प्रकल्प व ढाळे-पिंपळगाव प्रकल्प परिसरात पुन्हा एकदा पावसाने दमदार बॅटिंग केल्याने प्रकल्पाच्या सांडव्यावरून ओसंडून पाणी वाहत आहे. परिणामी भोगावती व नीलकंठा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने नदीकाठच्या गावांना धोका निर्माण झाला आहे.

पिंपरी येथील भोगावतीवरील पूल आठवड्यात चार वेळा पाण्याखाली गेला असून, त्यातूनच विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, वाहनधारकांचा जीवघेणा प्रवास सुरू आहे.

## पुलावरून जीवघेणा प्रवास



तसेच हिंगणी येथील भोगावती नदीवरील जुना दगडी पूल पाण्याखाली गेला असून, मळेगाव- हिंगणी- वैराग वाहतूक ठप्प झाली. दगडी पुलावर मोठे खड्डे व मध्यभागी पूल खचल्याने भविष्यात मोठा धोका होण्याची संभावना निर्माण झाली आहे. साकत येथील नीलकंठा नदीवरील पूल देखील अरुंद व पुलाच्या दुतर्फा कठडे नसल्याने धोकादायक बनला आहे. दरवर्षी पावसाळ्यात पूल अरुंद असल्याने हिंगणी, पिंपरी, साकत, मळेगाव येथील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. संबंधित प्रशासनाने, सरकारने हिंगणी, पिंपरी, साकत येथील अरुंद व धोकादायक पुलाची स्थिती व नागरिकांची होणारी हालअपेष्टा पाहून उंच पुलासाठी मंजुरी देऊन तत्काळ पुलाचे काम सुरू करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

पिंपरी (सा) येथील पूल दरवर्षी पावसाळ्यात नेहमीच पाण्याखाली जातो. पुलाची उंची कमी असल्याने वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे. विद्यार्थ्यांना शाळेत जाता येत नाही, रुग्णाला दवाखान्यात नेताना मोठी कसरत करावी लागते. शेतकऱ्यांना जनावरे, शेतमाल वाहतूक करताना मोठी कसरत करावी लागते. प्रशासनाने नव्याने पुलाची उभारणी करून नागरिकांचा होणारा त्रास कमी करावा.
**-चेतन काशीद,** सरपंच, पिंपरी (सा) (ता. बार्शी)

साकत येथील नीलकंठा नदीवरील पुलाचा बराचसा भाग पाण्यात वाहून गेला आहे. पूल अरुंद व कमी उंचीचा असल्याने पुलावरून वाहतूक करणे धोकादायक बनले आहे. पुलाची उंची वाढवून नवीन पुलाची उभारणी करावी.
**- सचिन मोरे,** सरपंच, साकत (ता. बार्शी)




निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ताः गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# मुदतवाढीनंतरही पीकविम्याच्या अर्जामध्ये ५० टक्क्यांची घट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान पीकविमा योजनेसाठी राज्य सरकारने १४ दिवसांची अतिरिक्त मुदत दिल्यानंतरही सोलापूर जिल्ह्यात केवळ ३ लाख २९ हजार २५६ अर्ज आले असून, ही संख्या गतवर्षीच्या तुलनेत ४४.६० टक्के इतकीच आहे.

मागील वर्षी तब्बल ७ लाख ३८ हजार १८३ शेतकऱ्यांनी अर्ज सादर केले होते. म्हणजेच यंदा सुमारे ५० टक्क्यांनी अर्ज संख्या कमी झाली आहे.

यंदा सोलापूर जिल्ह्यात २ लाख ४८ हजार ९१९.०६ हेक्टर क्षेत्र पीकविमाअंतर्गत संरक्षित करण्यात आले असून, शेतकऱ्यांकडून १८ कोटी १८ लाख ६२ हजार २२९ रुपये हप्त्याच्या स्वरूपात जमा करण्यात आले आहेत.

राज्य सरकारने यंदा योजनेत केलेले महत्त्वाचे बदल, अधिसूचित पिकांमधील विसंगती, ॲग्रीस्टॅकचा अभाव आणि नुकसान भरपाईबाबत शेतकऱ्यांचा वाढता अविश्वास या साऱ्या गोष्टींमुळे जिल्ह्यातील चार लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी पीकविमा योजना नाकारली आहे. शिवाय अनेक शेतकऱ्यांना मागील वर्षी भरलेला विमा असूनही, नुकसान भरपाई मिळालेली नाही. ॲग्रीस्टॅकसारख्या अटींमुळेही अर्ज प्रक्रियेतील अडथळे वाढले.

# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी व साफळे गावांना भेटी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती 19 ते 21 ऑगस्ट दरम्यान सोलापूर जिल्हा दौऱ्यावर असून आज सकाळी शासकीय विश्रामगृह येथे समिती प्रमुख आमदार सुहास कांदे यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेतली व समितीचा आजचा स्थळ भेटीचा कार्यक्रम अंतिम केला. समितीने स्थळ भेटीसाठी अक्कलकोट तालुक्यातील कोन्हळी, साफळे गावांना भेटी दिल्या. यावेळी महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समीतीचे सदस्य आमदार उमेश यावलकर, देवेंद्र कोठे, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, अमोल मिटकरी व धीरज लिंगाडे यांची उपस्थिती होती.

उर्वरित समिती सदस्य आमदार सर्वश्री. रत्नाकर माणिकराव गुट्टे, किर्तीकुमार भांगडिया, शंकर जगताप, संतोष बांगर, राजू कारेमोरे, मनोज कायंदे, , ज्ञानेश्वर म्हात्रे, अमोल मिटकरी, सचिन अहिर उद्यापासून समिती सोबत पाहणी दौरे करणार आहेत.

**अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी व साफळे गावांना भेटी**

समितीने अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील आश्रम शाळेला भेट दिली. यावेळी समिती प्रमुख व सदस्य यांनी आश्रम शाळेची पाहणी केली तसेच वर्गामध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी तसेच शिक्षक वर्गाशी संवाद साधला. समितीने विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येते का याची माहिती घेतली तसेच काही विद्यार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात वर्गातील बोर्डावर लिहिण्यास सांगितले तसेच काही विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यासोबत खाली बसून विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेची माहिती घेतली. तसेच उजळणी, पाढे विद्यार्थ्यांना येतात का याचीही समिती सदस्यांनी खात्री केली. त्याप्रमाणे समिती प्रमुख व सदस्यांनी शिक्षक वर्गाशी संवाद साधून विद्यार्थ्यांना योग्य पद्धतीने तसेच शासकीय नियमाने शैक्षणिक उपक्रम तसेच सकाळचा नाष्टा दुपारचे व रात्रीचे जेवण तसेच अन्य सोयीसुविधा व्यवस्थित दिल्या जात आहेत की नाही याविषयी जाणून घेतले. तसेच संस्थेच्या वतीने संपूर्ण शासकीय निकष पूर्ण केले जात आहेत की नाही याविषयी समितीने माहिती घेतली. त्याप्रमाणे समितीने अक्कलकोट तालुक्यातील साफळे येथील महादेव काशीराया पाटील प्राथमिक आश्रम शाळेस भेट देऊन येथील विद्यार्थ्यांशी व शिक्षक वर्गाशी संवाद साधून येथे देण्यात येत असलेल्या शैक्षणिक व अन्य सुविधाची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रगती अहवाल समजण्यासाठी समिती प्रमुख व सदस्यांनी काही



विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून माहिती जाणून घेतली. समितीने या संस्थेच्या स्वयंपाक गृहाची ही पाहणी करून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता व दर्जा याची माहिती घेतली.

**समितीचे 20 व 21 ऑगस्ट रोजी चे कार्यक्रम**

बुधवार, दि. 20 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 ते 2 वाजता स्थळांना भेटी देणे. दुपारी 2.00 ते 3.00 वाजता राखीव. दुपारी 3 ते 5 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे पोलीस अधीक्षक कार्यालय, महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती, प्रादेशिक परिवहन कार्यालय, औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कृषी अधीक्षक कार्यालय, पशुसंवर्धन कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी व मेंढी विकास महामंडळ, अधीक्षक व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे आस्थापनेवरील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ याबाबत बैठक घेतील.

गुरुवार, दि. 21 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 10 ते 2 वाजता. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, जिल्हाधिकारी कार्यालय, जात पडताळणी समिती तसेच जिल्हा परिषद कार्यालय, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण उपायुक्त/ सहायक आयुक्त समाज कल्याण, सोलापूर यांच्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी / कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाकरीता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, सदस्य सचिव जात पडताळणी समिती, स उपायुक्त व सहायक आयुक्त समाज कल्याण यांच्यासमवेत बैठक.

दुपारी 2.00 ते 3.00 वाजता राखीव. दुपारी 3 ते 4.30 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे समितीने विविध प्रकल्प व कामांच्या केलेल्या पाहणी दरम्यान समितीच्या निर्देशनास आलेल्या काही प्रमुख बाबींसदर्भात संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेण्यात येणार आहे.

**तपासणी**

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती ही जिल्ह्यातील संबंधित शासकीय विभागाच्या विविध कार्यालयांना भेटी देऊन विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी कर्मचारी यांच्या भरती, भरती आरक्षण व अनुशेष तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना इत्यादी संदर्भातील अद्यावत माहितीची पाहणी करून शासकीय निकषाप्रमाणे याची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे की नाही याची तपासणी करणार आहे. यावेळी समिती समवेत बैठकीस व पाहणी दौऱ्यास अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, इतर बहुजन कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, समाज कल्याण च्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी विना पवार, अक्कलकोट तहसीलदार विनायक मगर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# मोहोळ नगरपरिषद प्रभाग रचना; २० सदस्य संख्या

**पोखरापूर : (कटूसत्य वृत्त):–** मोहोळ नगरपरिषदेच्यानिवडणुकीचे बिगुल पुन्हा एकदा वाजले असून १८ ऑगस्ट रोजी नगरपरिषदेची प्रभाग रचना जाहीर झाली.

लोकसंख्येच्या निकषानुसार मोहोळ नगर परिषदेच्या १०प्रभागांमध्ये २० सदस्य संख्या होणार असून आता इच्छुक उमेदवारांचे आरक्षणाकडे लक्ष लागले आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या बाबतचा निकष लावण्यात आला असून त्यामध्ये मोहोळची लोकसंख्या २७ हजार मोहोळ नगरपरिषद, मोहोळ, मोहोळ नगरपरिषद, मोहोळ. ८३३ आहे. २५ हजार लोकसंख्या असलेल्या शहराला २० सदस्य राहणार आहेत. तर त्या पुढील ३ हजार लोकसंख्येसाठी १ सदस्य वाढणार आहे. केवळ १६७ लोकसंख्या कमी पडल्यामुळे मोहोळ नगरपरिषदेमध्ये २१ सदस्य संख्या होवू शकत नाही.

**प्रभागनिहाय लोकसंख्या व परिसर**

प्रभाग – १ : लोकसंख्या – २४२६ समाविष्ट परिसर गायकवाड वस्ती, भोसले वस्ती, शिंपळकर वस्ती, जुना बिटले रोड, गायकवाड वस्ती, पंढरपूर रोड, काळे वस्ती, फडतरे वस्ती, मांडवे वस्ती,

प्रभाग – २ : लोकसंख्या – २७०८ समाविष्ट परिसर नवाजनाचा मळा, कुर्डे गल्ली, भांगे वस्ती, गावडे वस्ती, नागनाथ मंदिर, नागनाथ मांगवडा, बाजार मांगवडा, गायकवाड वस्ती, सोनवणे प्लॉटिंग, स्टेशन रोड

प्रभाग ३ : लोकसंख्या – २७१७ समाविष्ट परिसर – नागनाथ तालीम, नागनाथ मंदिर परिसर, नागनाथ गल्ली, उर्दू शाळा, धनगर गल्ली, रोहिदास नगर, चाटे गल्ली, गुमते घाट, ज्योतिबा मंदिर, साळी–माळी गल्ली




प्रभाग – ४ : लोकसंख्या – ३०२६ समाविष्ट परिसर – स्वामी विवेकानंद शाळा परिसर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, मस्जिद, उजनी कॉलनी परिसर, सिमोलंघन पांद रस्ता परिसर

प्रभाग ५: लोकसंख्या – ३१३४ समाविष्ट परिसर भुसार पेठ, वाणी गल्ली, सराफ पेठ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, सिमोलंघन पांद रोड, सॉ मिल सोलापूर रोड, बुद्धनगर, कन्या प्रशाला शाळा, सिद्धार्थनगर, मच्छी मार्केट परिसर

प्रभाग – ६ : लोकसंख्या – २५१५ समाविष्ट परिसर ब्राह्मण गल्ली, देशमुख गल्ली, आदर्श चौक, कुंभार गल्ली, बागवान चौक, वडार गल्ली, मेहबूबनगर, आदर्श चौक परिसर, महात्मा फुले भाजी मंडई परिसर, चौमुखी मारुती मंदिर परिसर

प्रभाग – ७ : लोकसंख्या – २६११ समाविष्ट परिसर– कुरेशी गल्ली, बुधवार पेठ, मार्केट यार्ड, मेन रोड, शिवाजी चौक परिसर, संभाजी चौक परिसर, देशपांडे गल्ली

प्रभाग ८ : लोकसंख्या – २६५५ समाविष्ट परिसर कळसे नगर, दत्तनगर, इंदिरानगर, गुलशन नगर, सोमराय नगर, यशवंत नगर, यमाई नगर, संभाजीनगर

प्रभाग ९ : लोकसंख्या – ३०८३ समाविष्ट परिसर क्रांतीनगर, समर्थ नगर, नाईकवाडी नगर, पटेल नगर, फाटे नगर, गुलमोहर पार्क, साकेत नगर रचना नगर, वायचळ वस्ती, डोके वस्ती, फडतरे वस्ती

प्रभाग १० लोकसंख्या – २९५८ समाविष्ट परिसर– सुभाष नगर, नागनाथ बरे नगर, विद्यानगर, अहिल्यानगर, बागवान नगर, कुंभारखाणी, बालाजी नगर, घरकुल माने वस्ती, गाढवे वस्ती, माने वस्ती, खरात वस्ती, मायक्का मंदिर, कोकणे वस्ती, चंद्रमोळी एमआयडीसी

# पिक नुकसानीची आ. कल्याणशेट्टींकडून पाहणी



**कासेगाव : (कटूसत्य वृत्त):–** मागील अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार व सततच्या पावसामुळे कासेगाव परिसरातील खरीप पिकांसह फळबागा, फळभाज्या व भाजीपाला यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर आमदार सचिन कल्याणशेट्टी व तहसीलदार किरण जमदाडे यांनी कासेगाव व परिसरातील विविध गावात प्रत्यक्ष शेतात भेट देऊन शेतशिवारातील नुकसानीची पाहणी केली. आ. कल्याणशेट्टी यांनी कृषी विभागाला तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर तहसीलदार किरण जमदाडे यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले. मे महिन्यापासूनच पावसाला सुरुवात झाली होती, मात्र सतत झालेल्या पावसामुळे कासेगाव, उळे, वडजी, वरळेगाव, बक्षीहिप्परगे, गंगेवाडी, उळेवाडी, मुस्ती, मुळेगाव, मुळेगाव तांडा, बोरामणी, तांदुळवाडी या गावांतील शेतकरी हवालदिल झाले आहेत.

काढणीला आलेली खरीप पिके शेतात कुजून गेली असून फळबागा व भाजीपाला यांनाही मोठा फटका बसला आहे. शेतकऱ्यांची उपजीविका धोक्यात आली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे....

# जिल्हा परिषदेत सीईओ जंगम यांच्या हस्ते ध्वजारोहण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** स्वातंत्र्य दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक कुलदीप जंगम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी तिरंगा राष्ट्रध्वजास सामूहिक मानवंदना देण्यात आली.

सीईओ जंगम यांनी जिल्हावासीयांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून सीईओ जंगम यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी अतिरिक्त



मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी आरती ओवाळून अभिवादन केले. यावेळी हरिभाई देवकरण प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी स्वच्छ सुजल गाव संकल्प मोहिमेची शपथ दिली. सीईओ जंगम यांनी सर्वअधिकारी, कर्मचाऱ्यांना भेटून स्दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव, म्हाडाचे संचालक अजयसिंह पवार, प्रसाद मिरकले, मीनाक्षी वाकडे, डॉ. संतोष नवले, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, सचिन जगताप, कादर शेख, नरेंद्र खराडे, सुलोचना सोनवणे, हरिदास हावळे, सुनील कटकधोंड, हरिबा सपताळे, सुलभा वठारे, विठ्ठल ढेपे, श्रीकांत मिरगाळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विस्तार अधिकारी सुहास गुरव यांनी केले. प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे यांनी आभार मानले.

# सोगाव येथिल शिबीरात ८७ जणांचे रक्तदान

**वाशिंबे (कटूसत्य वृत्त):–** अखंड हरिनाम सप्ताह निमित्त श्री शिवलीलामृत पारायण सोहळा सोगाव पश्चिम येथे मोठ्या उत्साहात भव्य दिव्य सोहळा पार पडला. सप्ताह निमित्त काल्याच्या कीर्तना दिवशी जगतगुरू संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. बाळासाहेब देहूकर महाराज यांच्या झाली.त्याच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घघाटन करून वृक्षारोपण करण्यात आला.यामध्ये ८७ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. प्रथमच सप्ताह निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. गाव परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. माजी सरपंच स्वप्निल सोमनाथ गोडगे यांनी रक्तदात्यास पाण्याचा जार भेट दिला. यानिमित्त देवस्थान समिती व सोमेश्वर तरुण मंडळाचे सहकार्य मिळाले. यावेळी मा. उपसरपंच शत्रुघ्न गोडगे, सुनील



सरडे, सुभाष सरडे, मा.उपसरपंच अभिमान गोडगे, चेअरमन शांताराम गोडगे, माजी सरपंच राहुल घनवट, वसुदेव सरडे, बळीराम सावंत, तात्यासाहेब सरडे, माजी सरपंच मारुती पवार, देविदास कुलकर्णी, गोरख पाखरे, राजेंद्र ननवरे, अनिल भोसले, महादेव सलमपुरे, सतीश भोसले उपस्थित होते.

# निरा नदी किनारी भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** राज्यात गेल्या तीन चार दिवसापासून, रात्रंदिवस पडणाऱ्या मुसळदार पावसामुळे,विविध धरणातील पाण्याची पातळी वाढली आहे. सातारा जिल्ह्यात सतत पडणाऱ्या पावसामुळे, वीर धरणातील पाण्याची पातळी वाढली गेली आहे.यामुळे वीर धरणाचे 9 दरवाजे उघडून नीरा नदीच्या पात्रात सुमारे 60 हजार क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.यामुळे नीरा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे.नीरा नदीत सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे,माळशिरस तालुक्यातील, नीरा नदीवरील अनेक बंधारे पाण्याखाली गेल्याने पुरपरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे नीरा नदी किनारी भागातील नागरिकांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा दिला गेला आहे.

नीरा नदी वरील सराटी पुलाजवळील बंधारा, अकलाई मंदिराजवळील बंधारा, लुमेवाडी बंधारा, वजराई बंधारा पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे यावरून होणारी वाहतूक बंद पडली आहे. पाण्याला प्रचंड ओढ



आणि वेग असल्याने नदी किनाऱ्यांवरील नागरिकांनी सतर्क रहावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

आज रात्री पर्यंत पाण्याच्या पातळीत आणखी वाढ होणार आहे. गत काही महिन्यांपूर्वी नीरा नदीत सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे माळीनगर, अकलूज, पिरळे परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी शिरले होते. एन डी आर एफ च्या टीम बोलावून नागरिकांची सुटका करण्यात आली होती. अकलूज मधील अकलाई मंदिराच्या पायऱ्यापर्यत पाणी आले होते.

नीरा व भीमा नदीचा नीरा नरसिहपूर येथे संगम होतो. उजनी धरणातून भीमा नदीत सुमारे 90 हजार क्यूसेक्स पाणी सोडण्यात आल्याने संगम, बाभुळगावं, वाफेगाव, नेवरे परिसरातील अनेक शेतकऱ्यांची शेती पाण्याखाली गेली आहे.

# महिलेवर ॲसिड हल्ला केल्या प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत ॲसिड हल्ला केल्या प्रकरणात अटकेतील आरोपी रवी विजय ताकतोडे (वय २५, रा. बापूजी नगर, सोलापूर) याचा जामीन अर्ज मंजूर केला आहे.

सदर बाजार पोलिस ठाण्यात गु.र.क्र. २७२/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम १२४(२) अन्वये ०२ एप्रिल २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी फियार्दीने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी याने फिर्यादी हिचेवर रागाच्या भरात ॲसिड हल्ला केला.

आरोपीच्या अटकेनंतर संबंधित पोलिसानी चार्जशीट मे. कोर्टात दाखल केली यानंतर आरोपीने जमीन अर्ज मे. जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर येथे दाखल केला होता. संबिधित वकिलाच्या युक्तिवाद नंतर मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश केंद्रे यांनी आरोपीचा जामिनाचा अर्ज मंजूर केला आहे.

वरील प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. अक्षय सोनकांबळे, ॲड. दशरथ वलेकर, ॲड. योगेश शिदगणे यांनी काम पाहिले.

# शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या सूचनेनंतर मुरूम अंथरण्याचे काम सुरू



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे अकलूज माळेवाडी परिसरात नागरिकांना चिखल व वाहतुकीच्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. पाईपलाईन व अंडरग्राउंड गटारीच्या कामासाठी रस्ते खोदण्यात आले होते. मात्र, त्याच काळात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी चिखल साचून रस्ते खडबडीत झाले होते. परिणामी शाळकरी मुलांपासून ते वृद्ध नागरिकांपर्यंत सर्वांनाच या मार्गावरून प्रवास करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.

ही परिस्थिती लक्षात घेतल्यानंतर शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी स्वतः पुढाकार घेत अकलूज नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. त्यांच्या सूचनेनुसार नगरपरिषद प्रशासनाने अकलूज माळेवाडी परिसरातील चिखलमय रस्त्यांवर तात्पुरत्या स्वरूपात मुरूम टाकण्याचे काम हाती घेतले आहे. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून परिसरात वाहतूक पूर्ववत सुरू झाली आहे.

‘सध्या पावसामुळे निर्माण झालेली ही तात्पुरती अडचण आहे. पाइपलाईन व अंडरग्राउंड गटारीचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधित रस्त्यांची पुनर्बांधणी करून नागरिकांना कायमस्वरूपी दर्जेदार रस्ते उपलब्ध करून दिले जातील.’ अशी माहिती यावेळी अकलूज नगरपरिषदेच्या वतीने देण्यात आली.

या उपक्रमामुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त होत असून, वेळेवर दिलेल्या सूचनेमुळे समस्या तात्पुरत्या स्वरूपात कमी झाल्याचे सर्वत्र मान्य केले जात आहे.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) डोळे, नयन
२) काव्य, कविता
३) भाजप पक्षाचे नाव पूर्ण लिहा
४) सीतापती ५) वेळ वाया न घालवता, पटकन ६) न भिणारा ७) श्वास घेण्याचे इंद्रिय १०) नस उलट लिहा
१२) पाय १५) स्वस्तच्या विरूध्दार्थी
१७) समुद्राच्या पाण्याची चव
१८) बसपाचे निवडणूक चिन्ह
१९) वभ उलट लिहा
२०) जंगलातील प्राण्यांचा राजा
२१) स्वभावाने रागीट २४) शपथ (हिंदीत) २५) दमयंती पती २६) आईची बहीण २८) भाकरी थापण्याची मोठी थाळी ३०) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत
३१) कामातून मिळालेला मोकळा वेळ
३२) अस्वलांचे खेळ दाखविणारा
३५) जुनाच्या विरूध्दार्थी
३६) दहा आणि सात मिळून होणारी संख्या
३७) लोखंडी आकडा, हुक
३९) शहर
४१) मास, महिना
४२) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक
४३) एक म्हण-** घर पोकळ वासा

**आडवे शब्द :** १) संसदेचे एक सभागृह
४) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे मुख्य नेते
८) स्वाद, रूची ९) पध्दत (हिंदीत)
११) सततची केलेली मागणी, तगादा १३) ख्रिश्चन धर्मसेविका
१४) दोन आणि एक मिळून होणारी संख्या
१५) राशीचक्रातील एक रास १६) फुलांची माळ, पराभव
१७) एक म्हण-** तशी माती
१८) भारतीय निवृत्त फिरकी गोलंदाज
२१) धातूचा बारीक तंतू २२) जंगल, अरण्य
२३) लगेच, तातडीने २७) दह्यात पाणी मिसळून घुसळलेले पेय
२८) सूर्योदयापूर्वीचा उष:काल २९) मनाला टोचणी लावणारे शल्य
३०) डासांमुळे थंडी वाजून येणारा ताप ३१) रास उलट लिहा
३२) संयम, धमकी देणे, धाप लागणे ३३) मक्षिका ३४) वतनाचा मालक
३७) दुर्ग, किल्ला ३८) बैलाच्या नाकात घातलेली दोरी
४०) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) कपाची जोडीदार ४४) मार्ग, रस्ता (हिंदीत)
४५) राजाचे निवासस्थान ४६) बे दुणे

## सुडोकु – 33

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | 9 | 3 | 7 | | 5 | | 1 |
| | 6 | 7 | | | | 4 | 2 | |
| | | 4 | | | | 3 | 7 | |
| 2 | | 6 | 5 | 3 | | 9 | | |
| 1 | | 8 | | 4 | | 2 | | 7 |
| 9 | 4 | | | 2 | | | 1 | 3 |
| | 5 | | 4 | | 6 | | 3 | |
| | | | 2 | 1 | | 7 | | |
| 4 | | | | 5 | | | 9 | |

